## ॲप वापरताना उद्भवणाऱ्या प्रश्नांची  उत्तरे (FAQ'S) :- (Last Updated 06/12/2019)

**१. प्रश्न :  ई-पिक पाहणी मोबाईल ॲप कसे स्थापित करावे?**

उत्तरः

- अँड्रॉइड स्मार्टफोनमध्ये कमीत कमी 20MB ची स्टोरेज आणि 1GB RAM  ची क्षमता असावी.
- नेटवर्क एर्या  मधे  आहात   का ?
- गूगल प्लेस्टोर मध्ये जा.
- Epeek Or ई-पिक असे टाईप करावे व नंतर स्थापित करावे.

(अँपल  फोनवर हा अँप स्थापित होणार नाही.)

**२. प्रश्न** : **मोबाईलवर अँप स्थापित करताना हँग होतो, ही समस्या कशी सोडवावी?**

उत्तरः

- अँप स्थापित  करताना मोबाईलमध्ये चालू असलेले इतर अँप बंद  करावे.
- मोबाइल पुन्हा बंद  करून चालू  करावा.

**३.प्रश्न  :  स्वागत स्रीन, नोंदणी दरम्यान पुढे सरकत नाही, (हँग होते)**

उत्तरः

- स्मार्ट मोबईलमधील इतर चालु  असलेले अँप बंद  करावेत आणि अँप पुन्हा उघडावा किंवा
- मोबाइल पुन्हा बंद  करून चालु करावा.

**४. प्रश्न  :  नोंदणी स्रीनच्या वेळी शेतकऱ्यास त्याचे नाव दिसत नाही?**

उत्तरः

७/१२ ची अद्ययावत प्रत सोबत असल्यास नाव नोंदविण्यास मदत होईल. ७/१२  वर नोंदणी केलेले नाव अचूकपणे टाकावे  ,प्रथम पहिले नाव टाकावे. पुढे जात नसल्यास मधले नाव टाकावे. नसल्यास शेवटचे नाव टाकावे. वरील कोणताही पर्याय काम करत नसल्यास अचूक खाते क्रमांक टाकावा. नसल्यास गट क्रमांक टाकावा. वरील कोणताही पर्याय काम करत नसल्यास असा प्रश्न डेव्हलमेंट टिम कडे रेफर करते असं सांगणे. डेव्हलमेंट टिम ने टाटा ट्रस्टस आणि ईपीक पाहणी टीम च्या निदर्शनास आणून द्यावे.

**५. प्रश्न  : स्मार्ट मोबाईलवर नवीन अतिरिक्त  खातेदार कसे नोंदवावे?**

उत्तरः

लॉगिन स्क्रीनवर "नवीन खातेदार नोंदणी करा " हा पर्याय उपलब्ध आहे. " या वर क्लिक करून सूचनांप्रमाणे नोंदणी करा. तथापि ही सुविधा एका मोबाईल वरून (२० नोंदणी आणि पीक माहिती) ह्यापुरती मर्यादित आहे.

**६. प्रश्न :  नोंदणीकृत मोबाइल नंबर बदलता येतो का ?**

उत्तर:

नोंदणी पूर्वी मोबाईल नंबर बदलने शक्य आहे. नोंदणी नंतर नाही.

**७.प्रश्न :  सांकेतांक विसरला  किंवा  मोबाइलवरून प्राप्त झालेला एसएमएस काढून टाकला असल्यास ?**

उत्तरः

सर्वप्रथम रजिस्ट्रेशन कधी केलं आहे ते विचारण्यात येईल.

नंतर जिल्हा, तालुका, नाव, सर्वे नंबर,  गट नंबर विचारून संकेतांक ई पीक पाहणी पोर्टल मधून शोधून देण्यात यावे. ४ अंकी पासकोड हा कायमस्वरुपी असल्यामुळे तो काळजीपूर्वक डायरीमध्ये लिहून ठेवावा

**८. प्रश्न : शेतकऱ्याने स्वतःचा फोटो कसा अपलोड करावा ?**

उत्तरः

आपण फोटो दोन पद्धतीने अपलोड करू शकता  .

- मोबाइल फोन फोटो गॅलरीमधून थेटपणे.
- मोबाइल कॅमेराने नवीन फोटो घेऊन अपलोड करू शकता.

**९.प्रश्न  : पिकांची  माहिती  कशी भरावी.?**

उत्तरः

खालीलप्रमाणे क्रमवार योग्यता चौकटीत माहिती भरावी

• खाते क्रमांक निवडावा.

• भूमापन/ गटक्रमांक निवडावा.

• निवडलेल्या सर्व्हे नंबर चे एकूण क्षेत्र चौकटीत आपोआप दिसेल.

• योग्य हंगाम निवडावा.

• पिकांचा योग्य तो वर्ग निवडावा. (निर्भेळ पीक, मिश्र पीक, पॉलिहाऊस पीक, शेडनेट हाऊस पीक, पड क्षेत्र)

• पिकाखालील क्षेत्र हे. आर. मध्ये भरावे.

• जल सिंचित असल्यास जल सिंचनाचे पर्याय निवडून त्याचा पुढील चौकटीत जल सिंचनाची पद्धत निवडावी.

• अजल सिंचित असल्यावर " अजलं सिंचित " हा पर्याय निवडावा.

- पिकाचा फोटो काढण्यासाठी ऍप ला अक्षांश रेखांश (शेताचे लोकेशन) घेण्याची परवानगी उच्च अचूकता (हाय ऍक्यूरसी मोड ) मध्ये द्यावी आणि पिकांचा एकच फोटो काढावा. मिश्र पिकाच्या संदर्भातही पिकांचा एकच फोटो घ्यावा. फोटो घेतांना त्या सर्व्हे नंबर च्या शक्यतितक्या मधोमध जाऊन पिकाचा फोटो घेण्यात यावा.

• सबमिट बटन दाबून माहिती अपलोड करावी.

**१०.प्रश्न : पिकांची नोंदणी करताना गट क्रमांक चुकीचा दिसतो ?**

उत्तरः

सर्वप्रथम गट नंबर विचारण्यात येईल व ई महाभूमि वरून ७/१२ वर असलेले गट नंबर चेक करण्यात येईल. गट नंबर ७/१२ वर समान असल्यास डेव्हलमेंट टिम कडे रेफर करते असं सांगणे. डेव्हलमेंट टिम ने टाटा ट्रस्ट चा माध्यमातून NIC ला कॉन्टॅक्ट करावा. एन आय सी कडून प्राप्त झालेली माहिती खातेदारांना फोनद्वारे देण्यात येईल व त्याची नोंद ठेवण्यात येईल

**११. प्रश्न : पेरणीचे क्षेत्र टाकायला गेल्यास क्षेत्र येतं नाही ?**

उत्तर:

या आधीच पीक नोंद झाली असेल तर असा मेसेज येतो. बाजूच्या) उजवीकडे) टॅब वर क्लिक करा तिथे पिकांची माहिती चा ऑप्शन मिळेल. त्यात आपल्याला हंगाम निहाय नोंदणी केलेली पिकांची यादी दिसेल

**१२. प्रश्न: पिकाची नोंदणी करताना कॅमेरा ओपन होत नाही ?**

उत्तर:

लोकेशन सेटिंग मध्ये जाऊन उच्च अचूकता (हाय अॅक्युरिसी) चा ऑप्शन सिलेक्ट करा. नंतर बॅक बटण करून पुन्हा कॅमेरा चा ऑप्शन वर जा.

**१३. प्रश्न : सामाईक खातेदारांनी नोंदणी कशी करावी?**

उत्तर :

सर्वांचा वतीने एकाने किंवा प्रत्येकाने आपआपली नोंदणी करता येईल.

**१४ .प्रश्न : संयुक्त खातेदाराने नोंदणी कशी करावी.?**

उत्तर :

प्रत्येकाने स्वतंत्रपणे आप आपली नोंदणी करावी.

**१५. प्रश्न : मोबाइल मध्ये मराठीतून नाव समाविष्ट करण्यासाठी काय करावे ?**

उत्तर :

अॅँप्लिकेशन मध्ये मराठी मधून नाव नोंदवनयाची तरतूद आहे

गुगल प्लायस्टोर वरती जाऊन इंडिक कीबोर्ड डाउनलोड करावा